RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग एक–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - ११, अंक - २१] गुरुवार ते बुधवार, मे २६ ते जून १, २०२२/ज्येष्ठ ५ - ११, शके १९४४ [पृष्ठे २४

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी यांजकडून

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ नुसार प्राथमिक अधिसूचना.

जिल्हा जळगाव

क्रमांक भूसंपादन/जळगाव-मनमाड/३रीरेला/एसआर/२९४/२०१९.— ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(झ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र. क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड-ए)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनी (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबतच्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींनुसार याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे ;

(नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(४)* नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण-चार खालील कार्यवाही पूर्ण होईल, त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनींवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनींच्या अथवा त्यांच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून, अशा मालकास उपरोक्त तरतुदींच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार, जिल्हाधिकारी, जळगाव, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) याच्या नियम १० च्या उप-नियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि

अभिलेख्याच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, जळगाव भाग, जळगाव यांस पदनिर्देशित करीत आहे.

सदर भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश क्रमांक भूसंपादन/एसआर-२९४/२०१९, दिनांक १० जानेवारी २०१९ अन्वये भूसंपादन करण्याकामी प्राधिकृत केले होते. तथापि, भूसंपादन संस्थेच्या (मध्य रेल्वे भुसावळ) यांच्या विनंतीनुसार व मा. जिल्हाधिकारी यांचेकडील आदेशानुसार सदर प्रस्ताव "भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३" च्या प्रचलित कायद्यातील तरतुदींनुसार संपादित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

अनुसूची - एक

जमिनींचे वर्णन

जिल्हा जळगाव, तालुका जळगाव

भूमापन किंवा गट क्रमांक		अंदाजित संपादन क्षेत्र
१		२
		हे. आर
गाव दापोरे		
१०५ पै.	..	० ०४
१०६ पै.	..	० ०१
१०७ पै.	..	० ०६
१०८ पै.	..	० १०
१११ पै.	..	० १३
११२ पै.	..	० ०२
२०७ पै.	..	० ३१
२११ पै.	..	० ३४
२१६ पै.	..	० २३
गाव नागझीरी		
१३८ पै.	..	० २५
१३९ पै.	..	० ०२
१४१ पै.	..	० ११
गाव पिंप्राळा		
१२० पै.	..	० ०६
१२१ पै.	..	० ०४

अनुसूची - तीन

विस्थापन नाही.

अनुसूची - चार

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार-अ, २३ एप्रिल २०२१ पृष्ठ क्रमांक १ ते ७ मधील ११ वरील नुसार भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियममधील कलम ३ मधील १०-क नुसार सूट मिळालेली आहे.

अनुसूची - पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम : निरंक.

(ब) प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक.

(क) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : निरंक.

टीप.–

(१) प्रस्तावित संपादनाखालील उक्त जमिनींच्या आराखड्याचे निरीक्षण उपविभागीय अधिकारी कार्यालय, जळगाव भाग, जळगाव तसेच उपमुख्य अभियंता (बांधकाम), मध्य रेल्वे भुसावळ, तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

(२) उक्त अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून तर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक अधिसूचनेत उल्लेख केलेल्या जमिनींचा कोणत्याही व्यक्तीने व्यवहार करू नये किंवा सदर जमिनींवर बोजा व अडथळा करू नये.

(३) संबंधित तलाठी यांनी संबंधित ७/१२ उताऱ्यावर संपादनाबाबत नोंद घ्यावी.

(४) दुय्यम निबंधक, जळगाव १, २, ३ यांनी संपादनाखालील गटाच्या खरेदी-विक्रीवर निर्बंधाबाबत कायद्यानुसार कार्यवाही करावी.

(५) संपादनाखालील जमिनींच्या संपादनाबाबत काही हरकती असल्यास अधिसूचना प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत इकडेस लेखी स्वरूपात हरकती दाखल करण्यात याव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार करण्यात येणार नाही.

अभिजीत राऊत,
जिल्हाधिकारी
तथा समुचित प्रशासन, जळगाव.

जळगाव, २३ मे २०२२.

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांजकडून

अधिसूचना

जिल्हा धुळे

क्रमांक भूसंपादन/कावि/एसआर-५/२०२०.– ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र. क्र. ७७/(भाग-२)/अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड-ए)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या धुळे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनी (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहेत अथवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत परिशिष्ट-दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींनुसार याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनींची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या परिशिष्ट-तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबतच्या परिशिष्ट- चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत परिशिष्ट-पाचमध्ये दिलेला आहे;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(४)* नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण-चार खालील कार्यवाही पूर्ण होईल, त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनींचा अथवा त्यांच्या भागांचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनींवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनींच्या अथवा त्यांच्या भागांच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून, अशा मालकास उपरोक्त तरतुदींच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार, जिल्हाधिकारी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप-नियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करण्यात येत आहे;

सदर अधिसूचनेबाबत ज्या हितसंबंधित व्यक्तीस आपल्या लेखी हरकती नोंदवावयाच्या आहेत, त्या अधिसूचना प्रसिद्ध दिनांकापासून ६० दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग, शिरपूर यांच्या कार्यालयात नोंदवाव्यात.

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या अंतर्गत नियम ३ च्या खंड *(ए)* अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, शिरपूर भाग, शिरपूर यांस पदनिर्देशित केले आहे.

ज्यासाठी जमीन संपादन करावयाची आहे ते प्रयोजन.— लघु पाटबंधारे योजना, अमरावती, जिल्हा नंदुरबार उजव्या उन्नयी बंधाऱ्यावरील मुख्य कालवा वितरिकाकरिता आवश्यक खाजगी जमीन मौजे झिरवे व निमगुळ, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

परिशिष्ट - १

जमिनींचा तपशील

जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा

गट नंबर		संपादन करावयाचे क्षेत्र		
		लागवडी-लायक क्षेत्र	पोट-खराबा क्षेत्र	एकूण क्षेत्र
१		२ हे. आर	३ हे. आर	४ हे. आर
		मौजे झिरवे		
३७/२	..	० ०५	० ००	० ०५
३७/३-अ	..	० ०९	० ००	० ०९
३७/३-ब	..	० १४	० ००	० १४

परिशिष्ट - १ – *चालू*

जमिनींचा तपशील

जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा

गट नंबर	संपादन करावयाचे क्षेत्र		
	लागवडी-लायक क्षेत्र	पोट-खराबा क्षेत्र	एकूण क्षेत्र
१	२	३	४
	हे. आर	हे. आर	हे. आर
मौजे झिरवे – *चालू*			
३६/७ ..	० ०८	० ००	० ०८
३६/६ ..	० ०८	० ००	० ०८
३६/५ ..	० १२	० ००	० १२
३५/१ ..	० ०७	० ००	० ०७
३१/१ ३३/१ ..	० १४	० ००	० १४
३३/२ ३३/३ ..	० ३५	० ००	० ३५
३४ ..	० ०२	० ००	० ०२
४४/२-अ ..	० २६	० ००	० २६
४३/१ ..	० १०	० ००	० १०
४३/२ ..	० १३	० ००	० १३
५६/१ ..	० ०५	० ००	० ०५
५६/२-क ..	० ०३	० ००	० ०३
५७/१ ..	० ०७	० ००	० ०७
५८/३ ..	० ०२	० ००	० ०२
५८/२-ब ..	० ०५	० ००	० ०५
५८/२-अ ..	० ०९	० ००	० ०९
५८/१ ..	० १७	० ००	० १७
६०/२ ..	० १२	० ००	० १२
४१/१ ..	० ०५	० ००	० ०५
४१/३ ..	० ०४	० ००	० ०४
४१/४ ..	० ०३	० ००	० ०३
४१/२ ..	० ०३	० ००	० ०३

परिशिष्ट - १ – *चालू*

जमिनींचा तपशील

जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा

गट नंबर	संपादन करावयाचे क्षेत्र		
	लागवडी-लायक क्षेत्र	पोट-खराबा क्षेत्र	एकूण क्षेत्र
१	२	३	४
	हे. आर	हे. आर	हे. आर
मौजे झिरवे – *चालू*			
४२/१-अ ..	० ०३	० ००	० ०३
४२/२-अ ..	० ०४	० ००	० ०४
४२/२-ब/१ ..	० ०६	० ००	० ०६
४२/३-अ/१ ..	० ०२	० ००	० ०२
४२/३-अ/२ ..	० ०३	० ००	० ०३
एकूण ..	**२ ५६**	**० ००**	**२ ५६**
मौजे निमगुळ			
३११/१ ..	० ०६	० ००	० ०६
३११/२ ..	० १९	० ००	० १९
३११/३ ..	० २४	० ००	० २४
३१३/१-अ ..	० १३	० ००	० १३
३१३/२ ..	० ०५	० ००	० ०५
३१३/४ ..	० १६	० ०२	० १८
३१३/३ ..	० ०७	० ००	० ०७
३०४/२-अ ..	० ०८	० ००	० ०८
३०४/२-ब/१ ..	० ०५	० ००	० ०५
३०४/१-ब ..	० ०७	० ००	० ०७
३०३/३-ब ..	० ०४	० ००	० ०४
३०३/२-ब ..	० ०६	० ००	० ०६
३०३/१-ब/१ ..	० ०९	० ००	० ०९
३२५/३ ..	० ०३	० ००	० ०३
२९८/१-ब ..	० ०१	० ००	० ०१
एकूण ..	**१ ३३**	**० ०२**	**१ ३५**
एकूण झिरवे+निमगुळ ..	**३ ८९**	**० ०२**	**३ ९१**

परिशिष्ट - २

सार्वजनिक प्रयोजनाबाबत तपशील

प्रकल्पाचे नाव : लघु पाटबंधारे योजना, अमरावती नाला, जिल्हा नंदुरबार, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

प्रकल्पाचे प्रयोजन : लघु पाटबंधारे योजना, अमरावती, जिल्हा नंदुरबार उजव्या उन्नयी बंधाऱ्यावरील मुख्य कालवा वितरिकाकरिता आवश्यक खाजगी जमीन मौजे झिरवे व निमगुळ, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे.

परिशिष्ट - ३

विस्थापनाबाबतचा तपशील : सदर प्रकल्पाच्या कामामुळे एकही व्यक्ती / कुटुंब राहत्या घरातून विस्थापित होणार नसल्याने विस्थापनाबाबत तपशील **"निरंक"** आहे.

परिशिष्ट - ४

सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासाचे निष्कर्ष

महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २६ एप्रिल २०१८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ चे कलम १०-क नुसार राज्य शासनास, लोकहितास्तव, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रकरण २ व प्रकरण ३ यांच्या तरतुदी लागू करण्यापासून (ख) सिंचन व विद्युतीकरण यांच्यासह ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्पास सूट देता येईल. सदर प्रस्ताव कलम १०-क (ख) "सिंचन व विद्युतीकरण यांच्यासह ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्प" या व्याख्येमध्ये बसत असल्याने सदर प्रकरणी सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास करणेत आलेला नाही.

परिशिष्ट - ५

प्रशासक नियुक्तीचा तपशील

प्रस्तुत प्रकरणी एकही व्यक्ती / कुटुंब विस्थापित होत नसल्याने पुनर्वसन व पुनर्स्थापना प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

प्रमोद भामरे,
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, शिरपूर भाग,
शिरपूर, जिल्हा धुळे.

शिरपूर, १४ मे २०२२.

आयुक्त, महानगरपालिका यांजकडून

मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

मंजूर विकास योजना (दुसरी सुधारित) मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे.

जाहीर सूचना

क्रमांक नर-१/वशि-१/९३/सन २०२२/दुरुस्ती.—आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांची अधिसूचना क्र. नर-१/वशि-१/१६८/सन २०२१, दिनांक १३ सप्टेंबर २०२१ अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र, नाशिक विभागीय पुरवणीमध्ये दिनांक १४ ऑक्टोबर २०२१ रोजी पृष्ठ क्र. १६ व १७ वर प्रसिद्ध झाली असून, त्यामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

परिशिष्ट - अ

या ऐवजी / Insteant of

अ. क्र.	मंजूर विकास योजना (दु.सु.) आराखड्या-नुसार प्रस्ताव / नियोजन	महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ *(१)* अन्वये प्रस्तावित फेरबदल
१	२	३
१	इस्लामपुरा वॉर्ड सर्व्हे नंबर ९८/२-अ/५+६+७, आरक्षण क्रमांक २२२, बेघरांसाठी घरे.	'बेघरांसाठी घरे' विभागातून वगळून 'रहिवास' विभागात समाविष्ट करणे.
२	इस्लामपुरा वॉर्ड सर्व्हे नंबर ८६/२/१-ब/२/२ आरक्षण क्रमांक २१६, पार्किंग.	भागश: क्षेत्र 'पार्किंग' विभागातून वगळून 'रहिवास' विभागात समाविष्ट करणे.
३	इस्लामपुरा वॉर्ड सर्व्हे नंबर २५-अ/२/४०-४५, आरक्षण क्रमांक १८९, शॉपिंग सेंटर.	'शॉपिंग सेंटर' विभागातून वगळून 'रहिवास' विभागात समाविष्ट करणे.

Schedule - A

Sr. No.	Present position as per sanctioned Development Plan (Second Revised)	Proposed Modification under Section 37 *(1)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966
1	2	3
1	Islampura ward Sr. No. 98/2-A/5+6+7, Reservation No. 222, housing for Dishoused.	To change the purpose of the land from Housing for Dishoused to Residential Zone.
2	Islampura ward Sr. No. 86/2/1-B/2/2, Reservation No. 216, Parking.	To change the purpose of the part land from Parking to Residential Zone.
3	Islampura ward Sr. No. 25-A/2/40-45, Reservation No. 189, Shopping Centre.	To change the purpose of the land from Shopping Centre to Residential Zone.

असे वाचावे / **Read as**

अ. क्र.	मंजूर विकास योजना (दु.सु.) आराखड्या-नुसार प्रस्ताव / नियोजन	महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ *(१)* अन्वये प्रस्तावित फेरबदल
१	२	३
१	इस्लामपुरा वॉर्ड सर्व्हे नंबर ९८/२-अ/५+६+७, आरक्षण क्रमांक २२२, बेघरांसाठी घरे.	'बेघरांसाठी घरे' विभागातून वगळून 'रहिवास' विभागात समाविष्ट करणे.
२	इस्लामपुरा वॉर्ड सर्व्हे नंबर ८६/२/१-ब/२/२ आरक्षण क्रमांक २१६, पार्किंग.	भागश: क्षेत्र 'पार्किंग' विभागातून वगळून 'रहिवास' विभागात समाविष्ट करणे.
३	इस्लामपुरा वॉर्ड सर्व्हे नंबर २५-अ/२/४०-४५, आरक्षण क्रमांक १८९, शॉपिंग सेंटर.	'शॉपिंग सेंटर' विभागातून वगळून 'रहिवास' विभागात समाविष्ट करणे.
४	इस्लामपुरा वॉर्ड सर्व्हे नंबर ९८/२-ब/पै., आरक्षण क्रमांक २२२, बेघरांसाठी घरे.	'बेघरांसाठी घरे' विभागातून वगळून 'रहिवास' विभागात समाविष्ट करणे.

Schedule - A

Sr. No.	Present position as per sanctioned Development Plan (Second Revised)	Proposed Modification under Section 37 *(1)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966
1	2	3
1	Islampura ward Sr. No. 98/2-A/5+6+7, Reservation No. 222, housing for Dishoused.	To change the purpose of the land from Housing for Dishoused to Residential Zone.
2	Islampura ward Sr. No. 86/2/1-B/2/2, Reservation No. 216, Parking.	To change the purpose of the part land from Parking to Residential Zone.
3	Islampura ward Sr. No. 25-A/2/40-45, Reservation No. 189, Shopping Centre.	To change the purpose of the land from Shopping Centre to Residential Zone.
4	Islampura ward Sr. No. 98/2-B/Part, Reservation No. 222, housing for Dishoused.	To change the purpose of the land from Housing for Dishoused to Residential Zone.

भालचंद्र गोसावी,

आयुक्त,

मालेगाव महानगरपालिका, मालेगाव,

जिल्हा नाशिक.

मालेगाव, १९ मे २०२२.

पोलीस आयुक्त यांजकडून

नाशिक पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील महत्त्वाची मर्मस्थळे, संवेदनशील ठिकाणे, लष्करी आस्थापने आणि प्रतिबंधित क्षेत्र इत्यादी ठिकाणे हे "नो ड्रोन फ्लाय झोन" (No Drone Fly Zone) म्हणून घोषित करून ड्रोनचे उड्डाणास मनाई / प्रतिबंध केलेबाबत.

संदर्भ :—(१) मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडील पत्र क्र. पोमसं/२१/७२७२/Meeting Drone-Tech/२०१/२०१३, दिनांक १२ ऑगस्ट २०२१.

(२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई कार्यालयाकडील पत्र क्र. एसएसए-०७२१/प्र. क्र.१५४/विशा-४, दि. २० जुलै २०२१.

(३) संचालक, माहिती व तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई कार्यालयाकडील परिपत्रक क्र. GAD-मातसं ०८८/३/२०१९-०/० DIT(MH), दिनांक ११ सप्टेंबर २०१९.

(४) नागरी विमान मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली कार्यालयाकडील ड्रोन नियम नोटिफिकेशन, File No. AV-२९०१७/३७/२०२१-SDIT-MOCA, दिनांक २५ ऑगस्ट २०२१.

(५) मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (सुरक्षा व सागरी सुरक्षा), राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई कडील परिपत्रक क्र. SID/IG-IS/Drone/२०२०-३२६, दिनांक २९ जानेवारी २०२० अन्वये.

"नो ड्रोन फ्लाय झोन" (No Drone Fly Zone)

मनाई आदेश

क्रमांक गोपनीय क्र. कक्ष-१०/विशा/९(२५)/सुरक्षा/नो ड्रोन फ्लाय झोन मनाई आदेश/१४७०/सन २०२२.— (१) उपरोक्त विषय व संदर्भान्वये, सप्टेंबर २०१९ मध्ये अरामको ऑईल रिफायनरीवर ड्रोनद्वारे हल्ला, ऑगस्ट २०१८ मध्ये व्हेनेझुएलाचे अध्यक्ष यांचेवर ड्रोन हल्ला, सन २०१८ मध्ये गॅटविक विमानतळावर ड्रोन हल्ला, सप्टेंबर २०१९ मध्ये इंडो-पाक सिमेवर जीपीएस ड्रोनद्वारे शस्त्रे टाकण्यात आली. तसेच अलिकडे दिनांक १३ जून २०२१ रोजी स्फोटके भरलेली दोन ड्रोन जम्मू विमानतळावरील भारतीय विमान स्टेशनवर आदळली. त्यामुळे इमारतीच्या छताला छोट्या प्रमाणात क्षती / नुकसान पोहचले. दुसरे ड्रोन मोकळ्या जागेवर आदळले. तसेच अमृतसर येथील आंतरराष्ट्रीय सीमेजवळ दिनांक ८ व ९ मे २०२२ रोजीच्या दरम्यान पाकिस्तानचा एक ड्रोन अंमली पदार्थाची तस्करी करून भारतीय सीमाहद्दीत घुसण्याचा प्रयत्न करीत असताना सीमासुरक्षा दलाचे जवानांनी सदरचा संशयीत ड्रोन पाडून निकामी केला.

(२) ज्याअर्थी, वरील ठिकाणी दहशतवाद्यांकडून ड्रोनद्वारे झालेले हल्ले पाहता, नाशिक पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील खालील महत्त्वाची मर्मस्थळे, संवेदनशील ठिकाणे व प्रतिबंधित क्षेत्र :—

(१) स्कूल ऑफ आर्टिलरी, देवळाली कॅम्प, नाशिक.

(२) इंडिया सिक्युरिटी प्रेस, महसूल आयुक्त कार्यालयाजवळ, नाशिक रोड, नाशिक.

(३) करन्सी नोट प्रेस, जेलरोड, नाशिक रोड, नाशिक.

(४) एकलहरा थर्मल पॉवर स्टेशन, एकलहरा, नाशिक रोड, नाशिक

(५) शासकीय मुद्रणालय, गांधीनगर, नाशिक-पुणे रोड, उपनगर, नाशिक.

(६) श्री काळाराम मंदिर, पंचवटी, नाशिक.

(७) एअरफोर्स स्टेशन, बोरगड, म्हसरूळ व देवळाली (साउथ), देवळाली कॅम्प, नाशिक.

(८) कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूल, गांधीनगर, उपनगर, नाशिक.

(९) मध्यवर्ती कारागृह, जेल रोड, नाशिक रोड व किशोर सुधारालय, सीबीएस जवळ, नाशिक.

(१०) महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी व गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, एमपीए परिसर, त्र्यंबकरोड, नाशिक.

(११) आकाशवाणी केंद्र, गंगापूर रोड, नाशिक.

(१२) पोलीस मुख्यालय व पोलीस आयुक्त कार्यालय, गंगापूर रोड, नाशिक.

(१३) जिल्हा व सत्र न्यायालय, सीबीएस जवळ, अशोक स्तंभ रोड, नाशिक.

(१४) जिल्हा शासकीय रूग्णालय, त्र्यंबकरोड, नाशिक.

(१५) रेल्वे स्टेशन, नाशिक रोड व देवळाली कॅम्प, नाशिक.

(१६) महानगरपालिका जलशुद्धीकरण केंद्र, (एमपीए जवळील, शिवाजीनगर, सातपूर येथील व विल्होळी, अंबड, नाशिक येथे नव्याने झालेले) असे मर्मस्थळ / संवेदनशील ठिकाणे आहेत.

वरील संवेदनशील व प्रतिबंधित क्षेत्रांचे ठिकाणी ड्रोन, पॅराग्लायडर्स, पॅरामोटर्स, हॉटएअर बलुन्स, मायकोलाईट, एअर क्राफ्ट इत्यादी तत्सम हवाई साधनांमार्फत भविष्यात दहशतवादी हल्ला होण्याची शक्यता लक्षात घेता व नाशिक पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात वरील लष्करी आस्थापने / महत्त्वाची मर्मस्थळे / प्रतिबंधित क्षेत्रांचे सुरक्षिततेकरिता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे दृष्टीने सर्व मर्मस्थळे, लष्करी आस्थापने व संवेदनशिल ठिकाणेही " नो ड्रोन फ्लाय झोन " (No Drone Fly Zone) म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच या अधिसूचनेद्वारे कोणत्याही प्रकारच्या ड्रोन (मानवरहित साधन), पॅराग्लायडर्स, पॅरामोटर्स, हॉटएअर बलुन्स, मायक्रोलाईट एअरक्राफ्ट इत्यादी तत्सम हवाई साधनांनी पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचे पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय ड्रोनचे उड्डाण / वापर करण्यास मनाई करणे आवश्यक असल्याबाबत माझी धारणा / खात्री झालेली आहे.

(३) त्याअर्थी, मी, **जयंत नाईकनवरे,** पोलीस आयुक्त, नाशिक शहर, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ *(१) (सी)* अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, नाशिक पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील महत्त्वाची मर्मस्थळे / लष्करी आस्थापने / संवेदनशील ठिकाणे / प्रतिबंधित क्षेत्र इत्यादी ठिकाणांचे सुरक्षिततेकरिता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे दृष्टीकोनातून नाशिक पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील खालील प्रमाणे निर्देश देत आहे ज्याला आदेश म्हणून समजण्यात यावे;

(१) परिच्छेद क्र. २ मधील नमूद केलेली मर्मस्थळे आणि संवेदनशील ठिकाणांच्या दोन (२) कि.मी. परिसरात कोणत्याही प्रकारचे ड्रोन (मानवरहित साधन), पॅराग्लायडर्स, पॅरामोटर्स, हॉट एअर बलुन्स, मायक्रोलाईट, एअरक्राफ्ट इत्यादी तत्सम हवाई साधनांना नाशिक पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात पोलीस आयुक्तांचे पूर्वपरवानगीशिवाय " नो ड्रोन फ्लाय झोन " (No Drone Fly Zone) व सदर ठिकाणी ड्रोन उड्डाण / वापर करण्यास मनाई करीत आहे.

(२) नाशिक पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील ड्रोन चालक व मालक यांनी त्यांना ड्रोनद्वारे कार्यक्रमाचे छायाचित्रीकरण करावयाचे असल्यास कार्यक्रमाचे ठिकाणाची माहिती अर्जात सादर करून, त्यात दिनांक व वेळ, ड्रोनची सविस्तर माहिती व ड्रोन ऑपरेटरचे नाव पत्ता व संपर्क मोबाईल क्रमांक व ड्रोन ऑपरेटर याने ड्रोन प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडून सादर करणे आवश्यक आहे.

(३) परिच्छेद क्र. २ मधील नमूद मर्मस्थळे, लष्करी आस्थापने / प्रतिबंधित क्षेत्र व संवेदनशील ठिकाणांचे प्रमुखांनी आपल्या मर्मस्थळ / आस्थापनांचे संरक्षण भिंतीवर " नो ड्रोन फ्लाय झोन " (No Drone Fly Zone) असे फलकखाली दिलेल्या फॉरमॅटमध्ये वॉर्निंग नोटिस ठळकपणे दिसतील अशा ठिकाणी लावण्यात यावे.



(४) नाशिक पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ड्रोनद्वारे करण्यात येणाऱ्या छायाचित्रीकरणाचे परवानगीबाबतचे संपूर्ण अधिकार पोलीस आयुक्तांनी राखून ठेवलेले आहे.

(५) सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध भारतीय दंड विधान कलम, इंडियन एअर क्राफ्ट कायदा, १९३४ व इतर प्रचलित कायद्यातील तरतुदींनुसार कारवाई संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांनी करावयाची आहे.

(६) सदरचा आदेश हा दिनांक १३ मे २०२२ रोजीचे ००.०५ वाजलेपासून पुढील आदेश होईपावेतो अंमलात राहील.

(७) सदरचा आदेश वेळेअभावी संबंधितांवर वैयक्तिक बजावणे शक्य होणार नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ *(२)* नुसार एकतर्फी देण्यात येत आहे.

(८) सदरचा मनाई आदेश / प्रतिबंध अधिसूचना माझे सही व शिक्क्यानिशी दिनांक १३ मे २०२२ रोजी निर्गमित करीत आहे.

जयंत नाईकनवरे,
पोलीस आयुक्त,
नाशिक शहर.

नाशिक शहर, दिनांक १३ मे २०२२.

BY DISTRICT JUDGE-1 AND ADDITIONAL SESSIONS JUDGE

Order

No. HKW/E.L. and M.L./2154/2022.– The District Judge-1 and Additional Sessions Judge, Ahmednagar is pleased to grant the following Officers Leave for the period mentioned against their names.

Sr. No.	Name and Designation of Judicial Officers	Period of Leave	Name of the Judicial Officer to whom the Charge is kept
1	2	3	4
1	Smt. V. P. Patil, 3rd Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Ahmednagar.	Medical Leave *Ex post facto* from 27th January 2022 to 6th February 2022 suffixing holidays on 7th February 2022.	Shri. V. J. Dongare, 4th Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Ahmednagar.
2	Shri. P. K. Kharate, 9th Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Ahmednagar.	Earned Leave from 2nd February 2022 to 4th February 2022 with permission to leave Headquarters from 1st February 2022 after office hours to 5th February 2022 before office hours.	Shri. D. R. Dande, 10th Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Ahmednagar.
3	Shri. G. K. Nandanwar, 11th Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Ahmednagar.	Medical Leave *Ex post facto* from 22nd January 2022 to 29th January 2022 suffixing holidays on 30th January 2022.	Shri. P. B. Remane, 12th Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Ahmednagar.
4	Shri. A. A. Khandale, 13th Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Ahmednagar.	Earned Leave from 4th February 2022 to 5th February 2022 suffixing holidays on 6th February 2022 with permission to leave Headquarters from 4th February 2022 after office hours to 7th February 2022 before office hours.	Shri. P. M. Unhale, 14th Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Ahmednagar.

5	Shri. N. S. Kakade, Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Shrigonda.	Medical Leave *Ex post facto* from 5th February 2022 to 13th February 2022.	Shri. H. J. Pathan, 2nd Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Shrigonda.
		Earned Leave from 21st February 2022 to 23rd February 2022 prefixing holidays on 19th February 2022 and 20th February 2022 with permission to leave Headquarters from 18th February 2022 after office hours to 24th February 2022 before office hours.	18th February 2022 after office hours to 23rd February 2022 before office hours **Civil Charge–** Shri. G. M. Sadhale, Civil Judge, Senior Division, Shrigaonda. **Criminal Charge–** Smt. S. G. Jadhav, Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Shrigonda. 23rd February 2022 before office hours to 24th February 2022 before office hours Shri. H. J. Pathan, 2nd Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Shrigonda.
6	Shri. H. J. Pathan, 2nd Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Shrigonda.	Earned Leave from 17th February 2022 to 22nd February 2022 with permission to leave Headquarters from 16th February 2022 after office hours to 23rd February 2022 before office hours.	16th February 2022 after office hours to 18th February 2022 before office hours Shri. N. S. Kakade, Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Shrigonda. 18th February 2022 after office hours to 23rd February 2022 before office hours. **Civil Charge–** Shri. G. M. Sadhale, Civil Judge, Senior Division, Shrigaonda. **Criminal Charge–** Smt. S. G. Jadhav, Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Shrigonda.

7	Shri. N. L. Yeolekar, Civil Judge, Senior Division, Sangamner.	Medical Leave *Ex post facto* from 27th January 2022 to 29th January 2022 suffixing holidays on 30th January 2022.	Smt. R. S. Bhosale, Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Sangamner.
8	Smt. J. V. Pekhale-Purkar, 3rd Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Sangamner.	Earned Leave from 16th February 2022 to 18th February 2022 suffixing holidays on 19th February 2022 to 20th February 2022 with permission to leave Headquarters from 15th February 2022 after office hours to 21st February 2022 before office hours.	Shri. V. K. Jadhav, 5th Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Sangamner.
9	Smt. S. N. Sachdeo, Civil Judge, Senior Division, Kopargaon.	Earned Leave from 16th February 2022 to 18th February 2022 suffixing holidays on 19th February 2022 to 20th February 2022 with permission to leave Headquarters from 15th February 2022 after office hours to 21st February 2022 before office hours.	Shri. V. U. Misal, Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Kopargaon.
10	Smt. A. R. Nagori, Civil Judge, Senior Division, Rahata.	Extended Earned Leave *Ex post facto* from 25th January 2022 to 29th January 2022 suffixing holidays on 30th January 2022 with permission to leave Headquarters from 25th January 2022 to 31st January 2022 before office hours.	Smt. S. N. Sachdeo, Civil Judge, Senior Division, Kopargaon.
11	Smt. N. N. Joshi, Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Ahmednagar.	Earned Leave from 8th February 2022 to 11th February 2022 prefixing holidays on 6th February 2022 and 7th February 2022 with permission to leave Headquarters from 5th February 2022 after office hours to 11th January 2022.	5th February 2022 after office hours to 10th February 2022 before office hours Smt. N. K. Nagargoje, 3rd Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Ahmednagar. 10th February 2022 after office hours to 11th February 2022. Smt. S. D. Javalgekar, 2nd Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Ahmednagar.
12	Smt. S. D. Javalgekar, 2nd Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Ahmednagar.	Earned Leave from 14th February 2022 to 22nd February 2022 prefixing holidays on 12th February 2022 and 13th February 2022 with permission to leave Headquarters from 12th February 2022 to 22nd January 2022.	Smt. N. K. Nagargoje, 3rd Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Ahmednagar.

13	Smt. S. Y. Shaikh, 7th Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Ahmednagar.	Earned Leave from 8th February 2022 to 9th February 2022 prefixing holidays on 6th February 2022 and 7th February 2022 with permission to leave Headquarters from 5th February 2022 after office hours to 10th February 2022 before office hours.	Shri. R. R. Pande, 6th Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Ahmednagar.
14	Smt. D. S. Khot, 4th Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Shrirampur.	Earned Leave from 3rd February 2022 to 5th February 2022.	Shri. N. K. Kharade, 3rd Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Shrirampur.
15	Smt. A. S. Wadkar, Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Rahuri.	Earned Leave *Ex post facto* from 31st January 2022 to 2nd February 2022 suffixing holiday on 30th January 2022 with permission to leave Headquarters from 29th January 2022 after office hours to 3rd February 2022 before office hours.	Smt. S. R. Shinde, Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Rahuri.
		Earned Leave from 16th February 2022 to 18th February 2022 suffixing holidays on 19th February 2022 and 20th February 2022 with permission to leave Headquarters from 15th February 2022 after office hours to 21st February 2022 before office hours.	Smt. S. R. Shinde, Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Rahuri.
16	Shri. R. A. Shaikh, Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Kopargaon.	Earned Leave from 16th January 2022 to 18th February 2022 suffixing holidays on 19th February 2022 and 20th February 2022 with permission to leave Headquarters from 15th February 2022 after office hours to 21st February 2022 before office hours.	15th February 2022 after office hours to 18th February 2022 Shri. A. C. Doiphode, 3rd Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Kopargaon. 19th February 2022 to 21st February 2022 before office hours Shri. J. M. Panchal, 2nd Joint Civil Judge, Senior Division and Additional Chief Judicial Magistrate, Kopargaon.
17	Shri. S. P. Ade, Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Shevgaon.	Earned Leave from 14th February 2022 to 16th February 2022 prefixing holidays on 12th February 2022 and 13th February 2022 with permission to leave Headquarter from 11th February 2022 after office hours to 17th February 2022 before office hours.	Smt. A. S. Birajdar, Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Pathardi.

18	Smt. M. V. Nimbalkar, 2nd Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Parner.	Earned Leave from 14th February 2022 to 17th February 2022.	Shri. D. R. Badve, Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Parner.

On return from leave above Judicial Officers are reposted to their respective posts.

Certified under Rule 39 of Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 that above Judicial Officers would have continued to officiate in their respective posts had they not proceeded on leave during the above period.

MILIND V. KURTADIKAR,
District Judge-1 and Additional Sessions Judge,
Ahmednagar.

Ahmednagar, 16th February 2022.

BY DISTRICT JUDGE-1 AND ADDITIONAL SESSIONS JUDGE

Order

No. EST/Leave/1000/2022.– Earned Leave for three (3) days from 3rd February 2022 to 5th February 2022 suffixing Sunday falling on 6th February 2022 with permission to leave Headquarter is hereby granted to Shri. M. S. Borale, Civil Judge and Judicial Magistrate, First Class, Nashik Road.

As per Section 39 of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 it is certified that above Judicial Officer would have continued to officiate in their respective post had they not proceeded on leave during the above period.

Charge during the absence of above Judicial Officer is kept with Smt. S. S. Deshmukh, Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Nashik Road with effect from 3rd February 2022 before office hours to 7th February 2022 before office hours.

Nashik, 11th February 2022.

Order

No. EST/Leave/1001/2022.– Earned Leave for three (3) days from 16th February 2022 to 18th February 2022 suffixed holiday and Sunday falling on 19th February 2022 and 20th February 2022 with permission to leave headquarter is hereby granted to Smt. K. N. Gowarilkar, Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Dindori.

As per Section 39 of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 it is certified that above Judicial Officer would have continued to officiate in their respective post had they not proceeded on leave during the above period.

Charge during the absence of above Judicial Officer is kept with Smt. S. R. Bandal, Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Dindori with effect from 15th January 2022 after office hours to 21st February 2022 before office hours.

Nashik, 11th February 2022.

Order

No. EST/Leave/1002/2022.– Earned Leave for three (3) days from 8th February 2022 to 10th February 2022 is hereby granted to Smt. P. S. Mali, 6th Joint Civil Judge and Judicial Magistrate, First Class, Nashik.

As per Section 39 of the Maharashtra Civil Services (Pay) Rules, 1981 it is certified that above Judicial Officer would have continued to officiate in their respective post had they not proceeded on leave during the above period.

Charge during the absence of above Judicial Officer is kept with Smt. P. A. Rajput, 7th Joint Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Nashik with effect from 8th February 2022 to 10th February 2022.

VIKAS S. KULKARNI,
District Judge-1 and
Additional Sessions Judge,
Nashik.

Nashik, 11th February 2022.

उपनिबंधक, सहकारी संस्था यांजकडून

आदेश

क्रमांक वि-४/एनएसके/एनएसके/एचएसजी/टीसी/६०९५/३०६/सन २०२२.- श्री. विपुल नेमिचंद पोद्दार, मुख्यप्रवर्तक, **निर्माणस् द्वारकापुरम को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड,** मयुर ट्रॅक्टरसमोर, टाटा मोटर्सजवळ, कन्नमवार ब्रिजजवळ, मुंबई-आग्रा रोड, नाशिक, मौजे नाशिक शिवारातील सर्व्हे नंबर ४०८/२/१/अ/ब/क यांसी एकूण क्षेत्र ५२००.०० चौरस मीटर नाशिक या मिळकतीवर सभासदांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ *(१)* अन्वये जावक क्रमांक एनएसके/एएसके/एचएसजी/टिसी/६०९५/सन २०२२, दिनांक २१ जानेवारी २०२२ अन्वये नोंदविण्यात आलेली असून महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १० अन्वये तिचे वर्गीकरण **गृहनिर्माण संस्था** असून उपवर्गीकरण **भाडेकरू सहभागीदारी संस्था** असे करण्यात आल्याचे याद्वारे जाहीर करीत आहे.

नाशिक, २१ जानेवारी २०२२.

आदेश

क्रमांक वि-४/एनएसके/एनएसके/एचएसजी/टीसी/६०९६/३३१/सन २०२२.- श्री. गिरीषचंद्र बालकराम गुप्ता, मुख्यप्रवर्तक, **बेन्च मार्क टॉवर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड,** आडगाव शिवार, हॉटेल जत्रा रोड, नाशिक, मौजे आडगाव शिवारातील सर्व्हे नंबर ३०७/२, प्लॉट नंबर १ यांसी एकूण क्षेत्र ४०४०.०० चौरस मीटर या मिळकतीवर सभासदांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ *(१)* अन्वये जावक क्रमांक एनएसके/एएसके/एचएसजी/टिसी/६०९६/सन २०२२, दिनांक २१ जानेवारी २०२२ अन्वये नोंदविण्यात आलेली असून महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १० अन्वये तिचे वर्गीकरण **गृहनिर्माण संस्था** असून उपवर्गीकरण **भाडेकरू सहभागीदारी संस्था** असे करण्यात आल्याचे याद्वारे जाहीर करीत आहे.

नाशिक, २१ जानेवारी २०२२.

आदेश

क्रमांक वि-४/एनएसके/एनएसके/एचएसजी/टीसी/६०९७/३३२/सन २०२२.- श्री. शब्बीर हातीम गंजीफ्रॉकवाला, मुख्यप्रवर्तक, **शिवशक्ती को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड,** नाशिक, समर्थनगर, भोसला मिलिट्री स्कूलजवळ, नाशिक, मौजे नाशिक शिवारातील सर्व्हे नंबर ७१०+७११+७३४, प्लॉट नंबर (९) ३ ते १० (फायनल प्लॉट नंबर ४५२ व ४५२-अे) यांसी एकूण क्षेत्र ९४८.७५ चौरस मीटर या मिळकतीवर सभासदांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ *(१)* अन्वये जावक क्रमांक एनएसके/एएसके/एचएसजी/टिसी/६०९७/सन २०२२, दिनांक २४ जानेवारी २०२२ अन्वये नोंदविण्यात आलेली असून महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १० अन्वये तिचे वर्गीकरण **गृहनिर्माण संस्था** असून उपवर्गीकरण **भाडेकरू सहभागीदारी संस्था** असे करण्यात आल्याचे याद्वारे जाहीर करीत आहे.

नाशिक, २४ जानेवारी २०२२.

आदेश

क्रमांक वि-४/एनएसके/एनएसके/एचएसजी/टीसी/६०९८/३२१/सन २०२२.- श्री. सचिन वामन नाळेगावकर, मुख्यप्रवर्तक, **श्री हरी हाईटस् को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड,** करंजकरनगर, दसक, जेल रोड, नाशिक रोड, नाशिक मौजे दसक शिवारातील सर्व्हे नंबर ६५/४/५/१, प्लॉट नंबर २ व ३ यांसी एकूण क्षेत्र ३२६.४० चौरस मीटर या मिळकतीवर सभासदांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ *(१)* अन्वये जावक क्रमांक एनएसके/एएसके/एचएसजी/टिसी/६०९८/सन २०२२, दिनांक २८ जानेवारी २०२२ अन्वये नोंदविण्यात आलेली असून महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १० अन्वये तिचे वर्गीकरण **गृहनिर्माण संस्था** असून उपवर्गीकरण **भाडेकरू सहभागीदारी संस्था** असे करण्यात आल्याचे याद्वारे जाहीर करीत आहे.

फयाज मुलाणी,
उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक,
तालुका नाशिक.

नाशिक, २८ जानेवारी २०२२.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांजकडून

आदेश

क्रमांक बी-१/७९५/सन २०२२.— श्री. सतिष मधुकर आहेर, ६ वे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे यांना दिनांक १ फेब्रुवारी २०२२ ते दिनांक ३ फेब्रुवारी २०२२ पावेतो अशी एकूण ३ दिवसांच्या परिवर्तित रजेस याद्वारे कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

रजेवरून परत आल्यावर श्री. सतिष मधुकर आहेर यांना ६ वे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे या पदी पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे परिवर्तित रजेच्या कालावधीत ६ वे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे या पदी पर्यायी इसमाच्या नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवण्यात येत आहे.

श्री. सतिष मधुकर आहेर, ६ वे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे यांचे उपरोक्त अनुपस्थितीचे कालावधीत त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती ए. टी. जगताप, ५ वे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे यांचेकडेस सोपविण्यात आलेला होता.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ चा नियम ३९ खालील टीप-२ अन्वये प्रमाणित करण्यात येते की, श्री. सतिष मधुकर आहेर, ६ वे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे हे वर नमूद केलेल्या कालावधीत परिवर्तित रजेवर गेले नसते, तर ते ६ वे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, धुळे या पदी स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

धुळे, ९ फेब्रुवारी २०२२.

आदेश

